"A++" Accredited By NAAC(2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सेंटर फॉर डिस्टन्स ॲण्ड ऑनलाईन एज्युकेशन

### सेंटर फॉर डिस्टन्स ॲण्ड ऑनलाईन एज्युकेशनच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सूचना

### (शैक्षणिक वर्ष २०२२—२३)

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर डिस्टन्स एज्युकेशन केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त बी.ए., बी.कॉम. करिता प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष आणि एम.ए. (भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी), एम.ए. (सामाजिक शास्त्रे : इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र), एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या प्रथम व द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२२—२३ च्या प्रवेशासाठी **दि. १८/०८/२०२२** पासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत. सदर अभ्यासक्रमांबाबतचे शुल्क व अधिकची माहिती www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर उपलब्ध आहे.

**विद्यार्थी/प्रवेशार्थीसाठी सर्वसाधारण सूचना :**

१. **इच्छुक विद्यार्थ्यांकरिता प्रवेश नि परीक्षा अर्ज http://www.unishivaji.ac.in/online_portal/ या संकेतस्थळावर Student Portal या लिंकवर दि. १८/०८/२०२२ पासून उपलब्ध आहेत.**
२. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरणेपूर्वी स्वत:चा युजर आयडी व पासवर्ड (User ID and Password) तयार करुन रजिस्ट्रेशन (Registration) करणे गरजेचे आहे.
३. सर्व अभ्यासक्रम हे सत्र पध्दतीने असल्याने एका शैक्षणिक वर्षात असलेल्या दोन्ही सत्रांचे विषय व परीक्षा शुल्क एकाच वेळेस भरून घेतले जाते.
४. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची एक प्रत विद्यार्थ्याने स्वाक्षरी करून त्यासोबत यापूर्वीच्या सर्व परीक्षांच्या गुणपत्रकांच्या (१२ वी व त्यानंतरच्या) स्वसाक्षांकित प्रती जोडून संबंधित अभ्यासकेंद्रांवर विहीत शुल्कासह जमा करावयाची आहे.
५. प्रवेश शुल्क ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने भरता येईल.
६. प्रथम वर्ष पदवी/पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी त्यांचे मूळ Transfer Certificate / Leaving Certificate / Migration Certificate **अर्जासोबत किंवा एक महिन्याचे आत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाहीत.**
७. संपूर्ण भरलेला अर्ज अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची अंतिम तारीख **दि. १५/१०/२०२२ पर्यंत.**
८. प्रथम वर्ष नव्याने ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक/मतदान ओळखपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे सोबत ठेवणे गरजेचे आहे.
९. विद्यार्थ्याने निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. तथापि परीक्षा केंद्र देण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाकडे राहील.
१०. अधिक माहितीकरिता संपर्क दूरध्वनी : ०२३१—२६०९४५१,२६०९४५२

| | |
|---|---|
| **डॉ. ए. एन. जाधव**<br>संचालक<br>परीक्षा व मूल्यमापन मंडळ | **डॉ. व्ही. एन. शिंदे**<br>प्र. कुलसचिव |

जा.क्र. शिवाजी वि./सीडीओई/१४५५/२०२२—२३

दिनांक :१८/०८/२०२२

Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक कं. 2

विषयः शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** महाविद्यालय स्तरावरील परीक्षेच्या नियोजनाबाबत.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील सर्व पारंपारिक अभ्यासकमासाठी (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विहित प्रकियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

1. पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** विद्यार्थ्यांच्या परीक्षा **दि. 05 जून, 2022 ते 24 जून, 2022** या कालावधीमध्ये महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर **प्रचलित ऑफलाईन स्वरुपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून** घेण्यात याव्यात.
2. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. 27 एप्रिल, 2022 च्या पत्रान्वये व त्यानुसार विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मार्च/एप्रिल 2022 च्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्रश्नसंचिका (Question Bank) उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच पदवी प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक करतांना दोन पेपरमध्ये किमान 02 दिवसांचे अंतर ठेवण्यात यावे. तसेच लेखी परीक्षेसाठी प्रत्येक तासाला 15 मिनिटे याप्रमाणे वेळ वाढवून देण्यात यावी.
3. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासकमावर प्रश्नसंचिका (Question Bank) तयार करण्यात यावी. प्रश्नसंचिका (Question Bank) किमान 5 ते 10 पट असावी. सदरची प्रश्नसंचिका (Question Bank) फक्त मार्च/एप्रिल 2022 करीता लागू राहील. तसेच सदर प्रश्नसंचिका (Question Bank) सर्व परीक्षार्थींना उपलब्ध करून देण्यात यावी.
4. पेपर सेट तयार करतांना जी प्रश्नसंचिका (Question Bank) प्रसिध्द / उपलब्ध केली आहे त्या मधीलच प्रश्न असावेत याची दक्षता संबंधीत पेपर सेटर यांनी घ्यावी. प्रश्नसंचिका (Question Bank) व पेपर सेट करण्यासाठी संबंधीत शिक्षकांना मानधन हे सद्या पेपर सेटींगसाठी असलेल्या नियमानुसार राहिल.
5. सदर परीक्षा महाविद्यालय/मान्यताप्रापत शिक्षण संस्था स्तरावर प्रचलित ऑफलाईन पध्दतीने होणार असल्याने ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात. सदर शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबतचे पत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी द्यावे.
6. उपरोक्त पदवी पारंपारिक **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** अभ्यासकमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्याबाबतची कार्यवाही संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांनी करणेची आहे.

उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक तयार करतांना विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या पदवी (भाग 2 व 3 ) परीक्षेचे ेळापत्रक अवलोकनी घेवून प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात यावे.

ूरशिक्षण केंद्राकडील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन ज्या त्या महाविद्यालयातील प्राचार्य/ समन्वयक, दूरशिक्षण केंद्र यांनी करणेचे आहे. तसेच महाविद्यालयाच्या परीक्षा समितीमध्ये समन्वयक, स्टडी सेंटर यांचा समावेश करण्यात ावा व दूरशिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षाबाबत काही शंका असल्यास मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मागर्दशन घ्यावे.

ूरशिक्षण केंद्राकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचा एखादा विषय महाविद्यालयात शिकविला जात नसल्यास नजिकच्या ाहाविद्यालयातील शिक्षकांच्याकडून त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका गोपनीय पध्दतीने तयार करून घेवून परीक्षा घेण्यात ाव्यात. तसेच प्रश्नपत्रिका तपासून प्राप्त गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत भरण्यात यावेत.

रीक्षेशी संबंधीत प्रात्यक्षिक/प्रबंध/प्रकल्प/ मौखिक परीक्षा प्रचलित ऑफलाईन पध्दतीने संबंधीत अभ्यासमंडळाच्या ूचनेनुसार आयोजित करण्यात याव्यात. तसेच सदर परीक्षेच्या अनुषंगाने काही अडचणी उदभवल्यास संबंधीत विषयाचे ीओएस चेअरमन, मा. अधिष्ठाता यांचे मार्गदर्शन घेण्यात यावेत. तसेच विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या दवी (भाग 2 व 3 ) परीक्षेचे वेळापत्रक अवलोकनी घेवून प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात यावे.

ुपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रचलित ऑफलाईन पध्दतीने परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्याने त्याबाबतची ानुषंगिक तयारी करण्यात यावी. तसेच सदरबाबतची सूचना सर्व संबंधीतांना देणेत याव्यात.

ादर परीक्षेत जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. विद्यार्थ्यांच्या रीक्षेबाबत/गुणाबाबत कोणतीही तकार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

ादर परीक्षेकामी होणारा खर्च महाविद्यालयाकडील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या 75% परीक्षा शुल्कामधून विद्यापीठ ेयमानुसार करण्यात यावा.

हाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे ासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

ादर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत हाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांचे मार्फत करणेची आहे.

रील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/152
7 MAY 2022

ा. प्राचार्य/संचालक, सर्व पारंपारिक महाविद्यालये यांना माहितीसाठी/योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
र्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग

Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक कं. 3

विषयः **शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील विद्यापीठ स्तरावरील परीक्षेच्या नियोजनाबाबत.** (पदवी स्तरावरील सर्व पारंपारिक अभ्यासकमाच्या (प्रथम वर्ष–प्रथम व द्वितीय सत्र) परीक्षा वगळून)

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने माहिती.

1. पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या **(प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र)** विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. 05 जून, 2022 ते 24 जून, 2022 या कालावधीमध्ये महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर **प्रचलित ऑफलाईन स्वरूपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून** घेण्याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक कं. 2, दि. 17 मे, 2022 रोजी प्रसिध्द करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

2. इतर सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासकमाच्या सर्व परीक्षा (उपरोक्त कं. 1 नुसारच्या परीक्षा वगळून) विद्यापीठामार्फत प्रचलित ऑफलाईन स्वरूपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात येतील. परीक्षेच्या प्रारंभ तारखा यथावकाश जाहीर करणेत येत आहे.

3. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील व्यावसायिक अभ्यासकमाच्या परीक्षा (अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, विधी, आर्किटेक्चर व इतर ) सर्व परीक्षा विद्यापीठामार्फत प्रचलित ऑफलाईन स्वरूपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात येतील.

4. डिप्लोमा/पीजी डिप्लोमा/सर्टिफिकेट इत्यादी अभ्यासकमाच्या परीक्षा विद्यापीठामार्फत प्रचलित ऑफलाईन स्वरूपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात येतील.

5. सर्व अभ्यासकमाच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रबंध/प्रकल्प इ. परीक्षा विद्यापीठामार्फत प्रचलित ऑफलाईन स्वरूपात अभ्यासकम निहाय निश्चित केलेल्या पध्दतीनुसार परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात येतील. सदरबाबत ऑन परीक्षा विभागाकडून सविस्तर कळविण्यात येत आहे.

6. सर्व अभ्यासकमाच्या परीक्षा सत्रनिहाय संपूर्ण अभ्यासकमावर अभ्यासमंडळाने यापूर्वीच निश्चित केलेल्या गुणांकन पध्दतीनुसार घेण्यात येतील.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निर्दशनास आणावे.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/156
दि. 18/05/2022
प्रतः

1. मा. प्राचार्य/संचालक, सर्व पारंपारिक महाविद्यालये यांना माहितीसाठी/योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासकमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
5. इंटरनेट विभाग – सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी
6. परीक्षा विभागातील सर्व संबंधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
7. पात्रता विभाग, पी.जी. प्रवेश विभाग – माहितीस्तव
8. जनसंपर्क अधिकारी कार्यालय – प्रसिध्दीकरीता

D/March 2022 Exam/Letter1

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :- 0231- 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A++' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/171 दि. 01 जून, 2022

प्रति,

1) मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2) मा. अधिविभाग प्रमुख,
सर्व अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- मार्च/एप्रिल, 2022 मधील होणा-या (उन्हाळी सत्रातील) परीक्षेच्या प्रारंभ तारखांबाबत...

महोदय/महोदया,

आपणांस अवगत करणेत येते की, शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील विद्यापीठ स्तरावरील परीक्षेच्या प्रारंभ तारखा सोबतच्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात येत आहेत. सोबतच्या परिपत्रकामध्ये उल्लेखित तारखा व अन्य तपशिलाप्रमाणे सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता करुन सूचनांचे काटेकोर पालन करून विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे. आपण यापूर्वीही विद्यापीठाच्या परीक्षा कामी योग्य ते सहकार्य केले आहे. याबद्दल मी आपले विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने आभार मानतो. तसेच यापुढेही असेच सहकार्य कराल ही अपेक्षा व्यक्त करतो.

कळावे.

आपला विश्वासू,

गजानन पळसे
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत :

1) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
2) मा. कुलगुरू कार्यालय
3) मा. प्र-कुलगुरू कार्यालय
4) मा. अवर सचिव, केंद्रिय लोकसेवा आयोग, नवी दिल्ली
5) मा. अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
} विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक हे कायद्यानुसार प्रसिध्द केले जाते याचा आणि विद्यापीठाच्या परीक्षेच्या संख्येचा आणि विद्यार्थी संख्येचा विचार करून सदर वेळापत्रकास बाधा पोहचणार नाही अशी दक्षता घेवून याआपल्या परीक्षांचे नियोजन करावे ही विनंती

6) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.
7) मा.संचालक,संचालनालय,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुबई
} महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 कलम 88 नुसार विद्यापीठाने परीक्षेचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर त्यानुसार विद्यापीठास परीक्षा घेणे बंधनकारक असते. हे लक्षात घेऊन कृपया आपण आपल्या परीक्षेचा कार्यक्रम जाहिर करावा.

8) मा. संचालक, संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई.
9) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
10) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे
} यांना माहितीसाठी

11) इंटरनेट विभाग - सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी
12) परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी - पुढील कार्यवाहीसाठी
13) पात्रता विभाग
14) पी.जी. प्रवेश विभाग
15) आयटी कक्ष - पुढील कार्यवाहीसाठी
16) संगणक केंद्र - पुढील कार्यवाहीसाठी

Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक क्र.05, मार्च/एप्रिल 2022 (उन्हाळी सत्र परीक्षा)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, 2016 कलम 88 तरतुदीस अनुसरुन मार्च/एप्रिल, 2022 होणाऱ्या विद्यापीठाच्या सर्व परीक्षांच्या प्रारंभ तारखा प्रसिध्द करण्यात येत आहेत.

### महाविद्यालयांसाठी /विद्यार्थ्यासाठी अत्यंत महत्वाच्या सूचना

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 ाळी सत्रातील परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने माहिती.

1. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रचलित ऑफलाईन स्वरूपात (वर्णनात्मक) परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून (कोविड पुर्व पध्दतीने) घेण्यात येतील. परीक्षेच्या प्रारंभ तारखा सोबत जोडलेल्या असून सविस्तर वेळापत्रक यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

2. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा सत्रनिहाय संपूर्ण अभ्यासक्रमावर अभ्यासमंडळाने यापूर्वीच निश्चित केलेल्या गुणांकन पध्दतीनुसार घेण्यात येतील.

3. शासन निर्देशानुसार परीक्षेसाठी प्रति तास 15 मिनिटे कालवधी वाढवून देण्यात येत आहे. तसेच दोन पेपरच्या दरम्यान (पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी वगळून) दोन दिवसांचा कालावधी देण्यात येत आहे

4. स्वंयम परिक्षा, भारतीय कम्पनी सचिव संस्थान यांचे मार्फत आयोजित Company Secretaries (CS) ची परीक्षा तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने अभियांत्रिकी, आर्किटेक्चर व औषधनिर्माण शास्त्र व इतर अभ्यासक्रमाची 'एमएचटी–सीईटी' सामाईक प्रवेश परीक्षा असेल त्या दिवशी संगणकाशी संबंधीत परीक्षा तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे जा. क्र. आस्थापना/2683, दि. 16 डिसेंबर, 2021 रोजीच्या परिपत्रकातील सार्वजनिक सुट्टया दिवशी विद्यापीठाच्या कोणत्याही लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा त्या तारखेस घेण्यात येवू नयेत.